मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भटक्या कुत्र्यांचा मुद्दा गाजला

## कुत्र्यांच्या हल्ल्यांची आकडेवारी अचंबित करणारी, 20 हजारांहून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकाच्या आज (दि.२०) झालेल्या पहिल्या सर्वसाधारण सभेत भटक्या कुत्र्यांचा प्रश्न चांगलाच गाजला. शहरातील वाढत्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर हा मुद्दा सभागृहात जोरदारपणे उपस्थित करण्यात आला.



भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक राजू मिसाळ यांनी या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी प्रतीकात्मक कुत्रा आयुक्त आणि महापौरांसमोर भेट स्वरूपात ठेवत प्रशासनाचे लक्ष वेधले. निवडणूक प्रचारादरम्यान नागरिकांकडून भटक्या कुत्र्यांमुळे होणाऱ्या त्रासाबाबत अनेक तक्रारी मिळाल्याचे त्यांनी सांगितले. नुकतीच शाळेच्या बसमधून उतरत असताना मुलांवर कुत्र्याने हल्ला केल्याची घटना घडल्याचा उल्लेख करत, "शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. त्यामुळेच हा मुद्दा आज सभागृहात मांडला," असे राजू मिसाळ यांनी स्पष्ट केले.

सभागृहात सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, गेल्या आठ महिन्यांत सुमारे २० हजारांहून अधिक नागरिकांना कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद आहे. गेल्या दहा वर्षांतील आकडेवारीही चिंताजनक असल्याचे समोर आले आहे.

दरवर्षी वाढत जाणारी ही संख्या प्रशासनासाठी धोक्याची घंटा असल्याचे मत अनेक नगरसेवकांनी व्यक्त केले. कुत्र्यांच्या निर्बंध आणि नियंत्रणासाठी ठोस धोरण आखावे, तसेच तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी सभागृहात करण्यात आली. या मुद्द्यावर प्रशासनाकडून कोणती भूमिका घेतली जाते आणि पुढील काळात काय निर्णय होतात, याकडे आता शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### गेल्या १० वर्षांतील कुत्रा चावण्याच्या घटनांची आकडेवारी

- 2016-17 : 10,533
- 2017-18 : 13,558
- 2018-19 : 14,842
- 2019-20 : 12,751
- 2020-21 : 13,832
- 2021-22 : 13,892
- 2022-23 : 18,500
- 2023-24 : 24,169
- 2024-25 : 28,099 (ऑक्टोबरपर्यंत)

# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीसह विविध विषय समिती सदस्यांची निवड

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नवनियुक्त सदस्यांना महापौर रवि लांडगे यांनी दिल्या शुभेच्छा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आज झालेल्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीसह विधी, शहर सुधारणा समिती, शिक्षण, महिला व बालकल्याण समिती तसेच क्रीडा, कला, साहित्य समिती व सांस्कृतिक समितीवर सदस्यांची निवड करण्यात आली. या सर्व सदस्यांना महापौर रवि लांडगे यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

( उर्वरित पान 2 वर )



### क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

- कैलास कुटे, शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, उदय गायकवाड, योगेश लांडगे (भारतीय जनता पार्टी)
- भाऊसाहेब भोईर, जितेंद्र ननावरे, प्रमोद कुटे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

### स्थायी समिती

- अभिषेक बारणे, शालिनी गुजर, मनिषा चिंचवडे, संदीप कस्पटे, सारीका गायकवाड, योगिता नागरगोजे, कृष्णा सुरकुले, शीतल वर्नेकर, अर्चना करांडे, मधुरा शिंदे, बाबासाहेब त्रिभुवन (भारतीय जनता पार्टी)
- सविता आसवानी, संतोष कोकणे, संदीप वाघेरे, विकास साने (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) » सुलभा उबाळे (शिवसेना)

### विधी समिती

- ज्ञानेश्वर जगताप, विनायक गायकवाड, कुंदा भिसे, सुजाता बोराटे, श्रुती डोळस, कुशाग्र कदम (भारतीय जनता पार्टी)
- शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, तुषार सहाणे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

### महिला व बालकल्याण समिती

- पल्लवी जगताप, नीता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, राणी पठारे, सुप्रिया चांदगुडे (भारतीय जनता पार्टी)
- निकिता कदम, सारिका मासूळकर, मनिषा लांडे (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

### शहर सुधारणा समिती

- अर्चना सस्ते, विनोद नढे, कुणाल वाव्हळकर, संजय (नाना) काटे, सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे (भारतीय जनता पार्टी)
- डॉ. वैशाली घोडेकर-लोंढे, अनंत कोऱ्हाळे, वैशाली काळभोर (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

### शिक्षण समिती

- पल्लवी वाल्हेकर, श्रुती वाकडकर, रविना आंगोळकर, कविता भोंगाळे, रीटा सानप, सारिका बोऱ्हाडे (भारतीय जनता पार्टी)
- प्रियांका कुदळे, योगिता बारणे, यश साने (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी)

# राज्य सरकारने तातडीने अनुसूचित जाती प्रवर्गातील उपवर्गीकरण लागू करावे

## अन्यथा आमदार अमित गोरखे घेणार मोठा निर्णय, संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाने १ ऑगस्ट २०२४ रोजी देशातील अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणाअंतर्गत उपवर्गीकरण करण्यासंदर्भात निकाल दिला. या निकालानंतर राज्य सरकारांना अनुसूचित जाती आणि जमातींमधील आरक्षणाच्या लाभापासून वंचित राहिलेल्या समाजाला उपवर्गीकरणाच्या माध्यमातून आरक्षणाचा लाभ देता येणार आहे. तेलंगणा उप-वर्गीकरण लागू करणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे. परंतु महाराष्ट्र राज्यात मात्र अजून यासंदर्भात कोणतीही पावले उचलली गेली नाही. अनुसूचित जाती (SC) प्रवर्गातील ५९ पोटजातींना आरक्षणाचा समन्यायी लाभ मिळवून देण्यासाठी'अ-ब-क-ड'(ABCD) नुसार उपवर्गीकरण तातडीने लागू करावे. राज्य सरकारने येणाऱ्या काळात यावर सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र राज्यव्यापी आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

असंतोष वाढल्यास सरकार जबाबदार आमदार गोरखे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे यापूर्वी अनेकदा हा विषय मांडला आहे. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'या विषयाचे गांभीर्य ओळखून, लवकरात लवकर अ-ब-क-ड आरक्षणाबाबतचा निर्णय जाहीर करू', असे ठोस आश्वासन दिले होते.

परंतु, याप्रकरणी अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने समाजात मोठ्या प्रमाणावर नाराजी पसरली आहे. त्यामुळे या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी आम्ही सरकारला पुन्हा एकदा रीतसर निवेदन पाठवणार आहोत. मात्र, त्यानंतरही सरकारने ठोस पावले उचलली नाहीत, तर मी केवळ एक आमदार म्हणून नाही, तर वंचित समाजाचा प्रतिनिधी म्हणून मोठा निर्णय घेणार, असा स्पष्ट इशारा आमदार अमित गोरखे यांनी दिला आहे.



### वंचितांना न्याय देण्याचा निर्धार..

» आरक्षण हा केवळ धोरणात्मक विषय नसून तो वंचित समाजाच्या भविष्याचा प्रश्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. माझा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मूळ आरक्षणाला १००% न्याय मिळवून देण्यासाठी आहे. जर आरक्षण मिळूनही ५९ पोटजातींमधील माझे बांधव शिक्षण आणि नोकरीपासून वंचित राहत असतील, तर त्यांच्या हक्कासाठी मी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार आमदार अमित गोरखे यांनी व्यक्त केला.

### विधीमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन..

» आमदार अमित गोरखे यांनी 'अ ब क ड' आरक्षणासाठी गेल्या काही वर्षांत अनेक आंदोलने आणि आंदोलनात्मक पावले उचलली आहेत. प्रामुख्याने २०२३ आणि २०२४ काळात हा लढा आणखी तीव्र झाला. २० मे २०२५ रोजी मातंग समाजाच्या वतीने मंत्रालयावर महाआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनात भाजपचे आमदार अमित गोरखे यांनी देखील पुढाकार घेतला. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून मातंग समाजाच्या मागण्यांवर तातडीने चर्चा करण्यासाठी बैठक आयोजित करण्याची विनंती केली होती. डिसेंबर २०२५ च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात आमदार अमित गोरखे यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. आपल्या शर्टवर 'अ.ब.क.ड.' असे अक्षरे प्रिंट करून त्यांनी विधीमंडळाच्या पायऱ्यांवर ठिय्या आंदोलन केले. अनुसूचित जातींमधील ५९ उपजातींपैकी अनेक घटक आजही मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. या वंचित घटकांसाठी स्वतंत्र आरक्षणाचा मुद्दा त्यांनी पावसाळी आणि हिवाळी दोन्ही अधिवेशनांत लावून धरला आहे.

### सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचा दाखला..

» आमदार गोरखे म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने अनुसूचित जाती आणि जमातींच्या आरक्षणात 'उप-वर्गीकरण' (Sub-classification) करण्यास कायदेशीर मान्यता दिली आहे. मग राज्य सरकार या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विलंब का लावत आहे? मातंग, चर्मकार, वाल्मिकी, मादिगा समाजासह ५९ जाती या आदेशाची वाट पाहत आहेत.

### प्रमुख मागण्या आणि भूमिका

» SC उपवर्गीकरण अंमलबजावणी: सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर, महाराष्ट्रातील ५९ उपजातींपैकी, ज्यांना अद्याप आरक्षणाचा योग्य लाभ मिळालेला नाही, अशा अत्यंत मागास उपजातींना प्राधान्य मिळण्यासाठी अ-ब-क-ड वर्गीकरण लागू करावे. न्यायालयीन आदेशाचे पालन: हे वर्गीकरण केवळ राजकीय मागणी नसून, सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाच्या निर्णयानुसार अंमलबजावणी करावी. समितीच्या अहवालाला गती: या संदर्भात स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या कामात होणारा विलंब टाळून लवकरात लवकर निर्णय घ्यावा, जेणेकरून उपेक्षित समाज मुख्य प्रवाहात येईल.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

## पिंपरी-चिंचवडमध्ये वर्षभरात 1.53 लाख कॉल्सना प्रतिसाद; वाकड आणि दिघी ठाण्यांचाही वेगवान प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

संकटकाळात 'डायल 112' हा क्रमांक फिरवला की मदतीसाठी पोलिस किती वेळात पोहोचतात? या प्रश्नाचे उत्तर आता अधिकृत आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत सरासरी 6 मिनिटांच्या आत पोलिस मदत घटनास्थळी पोहोचत असून, त्यात हिंजवडी पोलिस ठाणे प्रथम (4:34 मिनिटे), वाकड द्वितीय (4:39 मिनिटे) आणि दिघी तृतीय (5:01 मिनिटे) ठरले आहे. वाढती लोकसंख्या, आयटी पार्क, औद्योगिक वसाहती, निवासी विस्तार आणि महामार्गावरील वाहतूक या सर्व आव्हानांमध्येही पोलिसांचा हा जलद प्रतिसाद नागरिकांना दिलासा देणारा ठरत आहे.

**वर्षभरात 1.53 लाखांहून अधिक कॉल**

डायल 112 हेल्पलाइनवर जानेवारी ते डिसेंबर 2025 दरम्यान तब्बल 1 लाख 53 हजार 247 कॉल प्राप्त झाले. विविध गुन्हे (31,622), महिलांशी संबंधित तक्रारी (30,612), मानसिक ताणतणाव व त्रास (23,672), रस्ते अपघात (13,031), विविध चौकशी (15,234), माहितीविषयक कॉल (7,863), चोरी (6,349), किरकोळ वाद (6,276), ज्येष्ठ नागरिक (3,309), लहान मुलांशी संबंधित (1,958) आणि आगीच्या घटना (711) अशा विविध प्रकारांमध्ये पोलिसांनी तत्परतेने मदत पोहोचवली आहे. डिसेंबर महिन्यात सर्वाधिक 14,685 कॉल आले, तर मार्च (13,082) आणि सप्टेंबर (13,521) महिन्यांतही कॉलचे प्रमाण जास्त होते. शहरासह ग्रामीण भाग, महामार्ग आणि निर्मनुष्य परिसर अशा सर्व ठिकाणी या सेवेचा प्रभावी वापर झाल्याची नोंद पोलिस दप्तरी करण्यात आली आहे.




# पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत स्थायी समितीसह विविध विषय समिती सदस्यांची निवड

( पान 1 वरून )

महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा आज संपन्न झाली. यामध्ये स्थायी समितीसह एकूण ५ विषय समित्यांच्या सदस्यपदावर निवड करण्याचा विषय सभापटलावर होता. पक्षीय बलाबलानुसार या समित्यांवर सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये भारतीय जनता पक्षाच्या वतीने पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी तर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने गटनेते भाऊसाहेब भोईर आणि शिवसेना पक्षाच्या वतीने गटनेते विश्वजित बारणे यांनी विषय समितीनिहाय बंद लिफाफ्यात पिठासीन अधिकारी रवि लांडगे यांच्याकडे नावे सादर केली. यानंतर समितीनिहाय सदस्यांची नावे जाहीर करण्यात येऊन त्यांची निवड झाल्याचे पिठासीन अधिकारी रवि लांडगे यांनी घोषित केले. महानगरपालिकेच्या विविध विकासात्मक, सामाजिक व प्रशासकीय कामकाजासाठी या समित्या महत्त्वाची भूमिका बजावणार असून, नव्याने निवड झालेल्या सदस्यांकडून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक कार्य होईल, असा विश्वास महापौर रवि लांडगे यांनी यावेळी व्यक्त केला.

निवड झालेल्या सर्व समिती सदस्यांचा पिठासीन अधिकारी तथा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, शिवसेना गटनेते विश्वजीत बारणे, आयुक्त श्रावण हर्डीकर यांच्यासह नगरसदस्य व महापालिका अधिकारी उपस्थित होते.

# पहिल्याच सर्वसाधारण सभेत नगरसेवकांची समिती 'बरखास्त' करण्याची मागणी!

## प्रशासनाचे लक्ष हे कामे मार्गी लावण्यावर नव्हे, तर कामे अडविण्याकडे असल्याचा आरोप करून वित्तीय समिती बरखास्त करावी, अशी मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाने करोना, तसेच त्यानंतर प्रशासक काळात सुरू केलेली वित्तीय समिती बरखास्त करण्याची मागणी नगरसेवकांनी सर्वसाधारण सभेत केली. प्रशासनाचे लक्ष हे कामे मार्गी लावण्यावर नव्हे, तर कामे अडविण्याकडे असल्याचा आरोप करून वित्तीय समिती बरखास्त करावी, अशी मागणी सभासदांकडून करण्यात आली.

'वित्तीय समितीच्या कारभारामुळे कोणती कामे अडली आहेत का, याबाबतची सर्व माहिती घेऊन त्याचा सविस्तर अहवाल सभेत दिला जाईल. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल,' असे स्पष्टीकरण महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले.

महापालिकेची सर्वसाधारण सभा महापौर मंजूषा नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. नगरसेवक पृथ्वीराज सुतार यांनी वित्तीय समितीचा मुद्दा सभागृहात उपस्थित केला. महापालिका प्रशासनाचा कल कामे करण्यावर नव्हे तर कामे अडविण्यावर अधिक असल्याचे दिसून येत असल्याचा आरोप सुतार यांनी केला.




### वित्तीय समितीवर सभागृहात जोरदार चर्चा

**» पुणे महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत करोना काळात स्थापन करण्यात आलेल्या वित्तीय समितीवरून वादंग निर्माण झाला. नगरसेवकांनी समितीमुळे कामांना विलंब होत असल्याचा आरोप करत ती बरखास्त करण्याची मागणी केली. लोकप्रतिनिधी अस्तित्वात असताना अतिरिक्त मंजुरीची अट अनावश्यक असल्याचे मत मांडण्यात आले**

ते म्हणाले, 'करोनाचा प्रार्दुभाव वाढला त्या काळात एकत्र येण्यास काही बंधने होती. या काळात वित्तीय समिती स्थापन करण्यात आली. मात्र, आता या समितीची आवश्यकता नसताना तिची मंजुरी घेणे आवश्यक करण्यात आले आहे. यामध्ये नाहक वेळ जात आहे. कामांना उशीर होतो. महापालिकेत लोकप्रतिनिधी निवडून आले असून, सभागृह अस्तित्वात आले आहे. त्यामुळे या समितीची आवश्यकता नाही.'

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नगरसेवक बाबूराव चांदेरे यांनीही वित्तीय समितीची आवश्यकता नसल्याचे सांगितले. ते म्हणाले, 'प्रशासक काळात महापालिकेत वित्तीय समिती होती, त्यामुळे काही हरकत नव्हती. मात्र, आता महापालिकेत लोकप्रतिनिधी निवडून आले आहेत. स्थायी समिती, सर्वसाधारण सभा अस्तित्वात आल्याने वित्तीय समितीची आवश्यकता नाही. याबाबत लगेच निर्णय घेण्यात यावा.' तर, 'या समितीची आवश्यकता नसेल, तर तत्काळ निर्णय घेऊन समिती बरखास्त करावी.

या समितीमुळे खूप वेळ वाया जात आहे', असे धीरज घाटे यांनी सांगितले. काँग्रेसचे ज्येष्ठ नगरसेवक अरविंद शिंदे म्हणाले, 'मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये महापालिकेची सर्वसाधारण सभा सर्वोच्च असते. तसेच, आर्थिक निर्णय स्थायी समितीमध्ये घेतले जातात. त्यामुळे वित्तीय समितीची आवश्यकता नाही. एकाच वेळी दोन केंद्रे नसतात. त्याप्रमाणे आर्थिक निर्णय घेताना महापालिकेची स्थायी समिती हीच सर्वोच्च असल्याने वित्तीय समिती तत्काळ बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात यावा.'

सभासदांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यावर स्पष्टीकरण देताना महापालिका आयुक्त नवल किशोर राम म्हणाले, 'वित्तीय समितीबाबत अभ्यास केला जाईल. या समितीमुळे कोणती कामे अडली असतील किंवा अडचण आली असेल, याची माहिती घेतली जाईल. या समितीमुळे त्रास होत असेल, तर पुढील बैठकीत सर्वांनी मिळून याबाबत निर्णय घेतला जाईल.'

### स्थायी समितीच सर्वोच्च?

**» काही नगरसेवकांनी आर्थिक निर्णयांसाठी स्थायी समिती व सर्वसाधारण सभा सक्षम असल्याचे सांगितले. दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर आर्थिक निर्णय होणे योग्य नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. समितीमुळे प्रशासकीय प्रक्रियेत वेळ वाया जात असल्याची टीका करण्यात आली.**

### आयुक्तांचा अभ्यासानंतर निर्णयाचा शब्द

**» महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी वित्तीय समितीमुळे प्रत्यक्षात कोणती कामे अडली आहेत का, याचा सविस्तर अहवाल तयार केला जाईल, असे स्पष्ट केले. त्रास होत असल्याचे आढळल्यास पुढील बैठकीत सर्वानुमते निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.**

# शिवजयंतीनंतर पहिल्याच आठवड्यात रायगडावरील 'रोप-वे' बंद...

## शिवजयंतीनंतरच्या पहिल्याच आठवड्यात सोमवारपासून (23 फेब्रुवारी) शनिवारपर्यंत (28 फेब्रुवारी) सलग सहा दिवस ही सेवा बंद राहणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

वार्षिक देखभाल आणि दुरुस्तीच्या कामांसाठी रायगड किल्ल्यावरील रोप-वे सेवा बंद ठेवण्याचा निर्णय रोप-वे प्रशासनाने निवेदनाद्वारे जाहीर केला. त्यामुळे शिवजयंतीनंतरच्या पहिल्याच आठवड्यात सोमवारपासून (२३ फेब्रुवारी) शनिवारपर्यंत (२८ फेब्रुवारी) सलग सहा दिवस ही सेवा बंद राहणार आहे. त्यामुळे २३ ते २८ फेब्रुवारी दरम्यान शिवप्रेमींना रायगडवर जाण्यासाठी पर्यायी मार्गांचा वापर करावा लागणार आहे.

दरम्यानच्या काळात रायगडावर येणाऱ्या पर्यटक, शिवप्रेमींनी सहकार्य करावे, असे आवाहन रायगड 'रोप-वे'चे व्यवस्थापक नरेंद्र भालेराव यांनी मिलेनियम रोप-वे अँड इन्फ्रा कंपनीच्या वतीने केले आहे. देखभाल-दुरुस्तीची सर्व कामे पूर्ण झाल्यानंतर रविवारी, १ मार्चपासून 'रोप-वे'ची पूर्वीप्रमाणे सुरु करण्यात येणार असल्याचेही कंपनीच्या वतीने भालेराव यांनी स्पष्ट केले.



छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्य हिंदवी स्वराज्याची राजधानी म्हणून रायगडावर शेकडो शिवप्रेमी, पर्यटक दररोज भेट देत असतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याची माहिती मिळावी, मराठ्यांच्या इतिहासावर संशोधन करणारे संशोधक-अभ्यासकांच्या दृष्टिने रायगड हा अत्यंत महत्त्वाचा किल्ला आहे. जावळीच्या घनदाट जंगलात, उंचच डोंगररांगांवर उभा असलेला हा किल्ला अनेक अर्थांनी महत्त्वाचा आहे. चढाईसाठी अत्यंत कठीण असलेला हा किल्ला शत्रूसाठी अभेद्य आणि स्वराज्य विस्तारासाठी अनेक अंगांनी महत्त्वाचा म्हणून त्याची राजधानीसाठी निवड छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेली. २०१७ साली रायगडावर 'रोप-वे' सुरु करण्यात आली. त्यामुळे पर्यटकांना सहज आणि सुरक्षितपणे किल्ल्याच्या शिखरावर जाता येते. अतिमहत्त्वाचे व्यक्ती आणि संशोधक-अभ्यासकही या मार्गाचा वापर करतात. या सेवेमुळे गडावर येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढल्याचे दिसते.

### रोप-वे सेवा २३ ते २८ फेब्रुवारीदरम्यान बंद

**» रोप-वेच्या माध्यमातून गडावर येणाऱ्यांच्या सुरक्षेसाठी खबरदारीचा उपाय म्हणून दरवर्षी देखभाल आणि दुरुस्तीची कामे रोप-वे प्रशासनाकडून केली जातात. याच कामांसाठी यंदा २३ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान ही सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पर्यटकांची गैरसोय टाळण्यासाठी रोप-वे प्रशासनाकडून याबाबतचे निवेदन प्रसिद्ध करण्यात आले आहे. गडावरील रोप-वे सेवा १ मार्च २०२६ पासून पुन्हा सुरळीतपणे सुरू होईल, असा विश्वासही कंपनीकडून व्यक्त करण्यात आला आहे.**

# देवस्थान, वतन जमिनींच्या भाडेपट्ट्यांशी संबंधित प्रकरणांमध्ये नोटीसा

## जिल्हा प्रशासनाने देवस्थान आणि वतनाच्या जमिनींच्या भाडेपट्ट्याशी संबंधित 343 प्रकरणांमध्ये नोटीसा बजाविल्या आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव पार्क आणि ताथवडे येथील जमीन गैरव्यवहारांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने देवस्थान आणि वतनाच्या जमिनींच्या भाडेपट्ट्याशी संबंधित ३४३ प्रकरणांमध्ये नोटीसा बजाविल्या आहेत. निवासी वापरासाठी दिलेली जमिनींचा व्यावसायिक वापर, जमीन भाडेकरराने देऊन उत्पन्न मिळविणे, मूळ लाभार्थ्यां व्यतिरिक्त नव्या सदस्यांचा समावेश करणे, निर्धारीत कालावधीत जमिनींचा वापर न करणे अशा कारणांमुळे या नोटीसा बजाविण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आली.

गेल्या काही महिन्यांपूर्वी कोरेगाव पार्क आणि ताथवडे येथील शासकीय जागांचा गैरवापर करण्यात आल्याचा प्रकार पुढे आला होता. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व भाडेपट्ट्यावर दिलेल्या देवस्थान आणि वतन जमिनींची सर्वंकष पडताळणी सुरू करण्यात आली असून अटींचे उल्लंघन किंवा बेकायदा हस्तांतरण करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशारा जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



### कोरेगाव पार्क–ताथवडे प्रकरणाची पार्श्वभूमी

**» कोरेगाव पार्क येथे महार वतनाच्या सुमारे ४० एकर जमिनीच्या विक्रीप्रकरणी नोंदींमध्ये फेरफार झाल्याचे उघड झाले. ही जमीन बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाला भाडेपट्ट्याने देण्यात आली होती. तसेच ताथवडे येथे महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या जागेच्या विक्रीप्रकरणी उपनिबंधकांसह २६ जणांवर गुन्हा दाखल झाला आहे. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सर्व तालुक्यांतील शासकीय जमिनींची पडताळणी करण्याचे आदेश दिले असून पुढील कारवाई सुरू आहे.**

जिल्हा प्रशासनाकडून भाडेपट्ट्यावर दिलेल्या सरकारी जमिनींचे जिल्हास्तरीय लेखापरीक्षण सुरू करण्यात आले आहे. नोटिसांद्वारे संबंधितांना ठरावीक कालावधीत स्पष्टीकरण मागविण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली असून स्पष्टीकरण न दिल्यास भाडेपट्टा रद्द करणे, वसुली प्रक्रिया आणि कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

कोरेगाव पार्क येथील शासकीय जमीनीचा गैरव्यवहार गेल्या नोव्हेंबर महिन्यात उघडकीस आला होता. महार वतनाची ४० एकर जागेची परस्पर विक्री करण्यात आली होती. ही जागा केंद्र सरकारच्या बॉटनिकल सर्व्हे ऑफ इंडिया संस्थेला भाडेपट्ट्यावर मंजूर करण्यात आली आहे. त्या जमिनीच्या नोंदींमध्ये फेरफार करण्यात आल्याचे उघडकीस आले होते. तसेच ताथवडे येथेही स्वतंत्र प्रकरणात, महाराष्ट्र पशुसंवर्धन विभागाच्या जागेचीही विक्री करण्यात आली होती. या प्रकरणी उपनिबंधक यांच्यासह २६ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वाकडजवळील १५ एकर ३२ गुंठ्यांच्या जागेची विक्री करण्यात आली होती.

दरम्यान, ही दोन्ही प्रकरणे उघडकीस आल्यानंतर जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सविस्तर अहवाल मागवून जिल्ह्यातील सर्व १३ तालुक्यांतील सरकारी जमिनींच्या नोंदींची पडताळणी करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार पहिल्या टप्प्यात ३४३ उल्लंघन प्रकरणे समोर आली आहेत.

### ३४३ प्रकरणांना नोटिसा

**» पुणे जिल्ह्यात देवस्थान व वतन जमिनींच्या भाडेपट्ट्याशी संबंधित ३४३ प्रकरणांमध्ये नोटिसा बजाविण्यात आल्या आहेत. निवासी वापरासाठी दिलेल्या जमिनींचा व्यावसायिक वापर, तृतीय पक्षाला भाड्याने देणे, लाभार्थी बदल, तसेच निर्धारित कालावधीत वापर न करणे अशी उल्लंघने आढळली. समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्यास भाडेपट्टा रद्द, वसुली आणि कायदेशीर कारवाईचा इशारा प्रशासनाने दिला आहे.**

> **जिल्ह्यात शासकीय मालकीच्या दोन हजार मालमत्ता आहेत. त्यातील ३४३ ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्याची बाब निदर्शनास आल्याने त्यांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत. नोटीशीला समाधानकारक उत्तर न मिळाल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**
>
> **- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी**

# समाविष्ट 23 गावांतील बांधकाम परवानगी रखडली; शासन निर्णयानंतरही अंमलबजावणी नाही

## पीएमआरडीएकडून अधिकार पालिकेकडे; तरी फाईल हस्तांतरण व यंत्रणा उभारणीला विलंब, विकसक संभ्रमात

**पुणे | प्रतिनिधी**

समाविष्ट 23 गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) महापालिकेला देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. मात्र, या निर्णयावर पीएमआरडीए आणि महापालिका यांनी अद्याप कोणतीच कार्यवाही न केल्याने बांधकाम परवानगीचे घोंगडे भिजतच पडले आहे.

हद्दीलगतची 23 गावे 30 जून 2021 रोजी महापालिकेत समाविष्ट करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. मात्र, या गावांचा एकत्रित विकास आराखडा तयार करण्याचे काम पीएमआरडीएच्या माध्यमातून सुरू असल्याने या गावांमधील बांधकाम परवानगीचे अधिकार पीएमआरडीएकडेच कायम ठेवण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. मात्र, पालिका हद्दीत असून बांधकाम प्रकल्पाबाबत कोणतेच अधिकार नसल्याचा प्रकार लक्षात आल्यानंतर तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बांधकाम परवानगीचे अधिकार महापालिकेला देण्याचे आदेश दिले होते.



त्यावर तब्बल सहा महिन्यांनंतर कार्यवाही होऊन गत आठवड्यात नगरविकास विभागाने पालिकेला नियोजन प्राधिकरण म्हणून बांधकाम परवानगीचे अधिकार देण्याचे आदेश काढले आहेत. मात्र, हे आदेश निघूनही त्यावर आठवडा उलटला तरी काहीच कार्यवाही पालिका आणि पीएमआरडीए या दोन्हींकडूनही झालेली नाही. त्यामुळे आता विकसकांनी नक्की कोणाकडे दाद मागायची, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

नगरविकास विभागाच्या आदेशानंतर पीएमआरडीएने तत्काळ यापूर्वी दिलेल्या बांधकाम परवानग्यांच्या फाईल आणि नवीन परवानगीचे प्रस्ताव तत्काळ महापालिकेला पाठविण्याची कार्यवाही करणे अपेक्षित होते. मात्र, अद्याप पीएमआरडीएकडून याबाबत पालिकेला काहीच कळविण्यात आलेले नाही, तर आता अधिकार आल्यानंतर परवानगीची पुढील प्रक्रिया राबविण्यासाठी आवश्यक अधिकारी आणि कर्मचारी यांची आवश्यक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे, त्यावर पालिकेकडूनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे जुन्या हद्दीतील बांधकाम परवानगीसह अन्य सर्वच कामे रखडली आहेत. याबाबत दोन्ही यंत्रणांनी तत्काळ कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, याबाबत पीएमआरडीएचे आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांच्याशी संपर्क साधला असता तो होऊ शकला नाही.

> **महापालिकेतील समाविष्ट गावांमधील बांधकाम परवानगीसाठी अभियंता आणि कर्मचाऱ्यांची नेमणूक पुढील दोन दिवसांत करण्यात येणार आहे. तसेच, पीएमआरडीएकडे असलेले बांधकाम परवानगीचे जे रेकॉर्ड उपलब्ध करून देण्यासाठी महापालिका आयुक्तांच्या मार्फत पत्र पाठवून पुढील कार्यवाही केली जाईल.**
>
> **- अनिरुद्ध पावसकर, शहर अभियंता, पुणे मनपा**